


साप्ताहिक
# डोंगरचा राजा
www.dongarcharaja.com
वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र
संपादक : अनिल वाघमारे




■ वर्ष ११ ■ अंक १७ ■ बुधवार, दि. १९ नोव्हेंबर २०२५ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.



## सर्वसामान्यांसाठी धडपडणारा चेहरा जिल्हा परिषद सभागृहात पाठवण्यासाठी मतदार उत्सुक; राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून राज पाटलांची उमेदवारी पक्की?

डोंगरचा राजा विशेष वृत्त..

मागील पंचवीस वर्षापासून प्रकाश दादांच्या सुखदुःखात सहभागी असलेले आणि राजकारणाच्या प्रत्येक टप्प्यावर दादांसोबत एकनिष्ठ काम करणारे वडवणी तालुक्यातील सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांच्या हितासाठी लढणारे आणि वृक्ष लागवडीच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनासाठी अहोरात्र झटणारे समाजभिमूख युवा नेतृत्व राज पाटील यांच्या निष्ठेला आणि केलेल्या कष्टाला फळ आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या माध्यमातून त्यांना मिळणार असल्याचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. चिखलबीड जिल्हा परिषद सर्कल मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची उमेदवारी त्यांनाच दिली जाणार असल्याचे सांगण्यात येत असून आमदार प्रकाश सोळंके या उमेदवारीवर शिक्कामोर्तब करतील अशी चर्चा आता ऐकायला मिळत आहे.

# निष्ठेला अन् कष्टाला फळ मिळेल!

## आ.प्रकाश सोळंके राज पाटलांसाठी पॉझिटिव्ह

वडवणी तालुक्यातील तीगांव येथील रहिवासी असलेले राज पाटील यांनी सन २००२ साली तीगांवचे बिनविरोध सरपंच पद भुषविल्यानंतर त्यांना आपल्या कार्य कर्तुत्वाला जोड मिळाली. या भागाचे विकासोभिमुख नेतृत्व आमदार प्रकाश सोळंके यांच्यासोबत नातेसंबंध असल्यामुळे त्यांनी आमदार प्रकाश सोळंके यांच्यासोबत राजकीय कार्यकर्ता म्हणून कामास सुरुवात केली. सर्वसामान्यासाठी धडपडणारा युवा कार्यकर्ता आणि सत्य आणि प्रामाणिकपणा हे गुण लक्षात आल्यानंतर आमदार प्रकाश सोळंके यांनी राज पाटलांना तीगांवच्या विकासासाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करून दिला. राज पाटलांनी आपल्या तिगांवमध्ये विकासाच्या विविध संकल्पना राबविल्या. विविध ठिकाणी विखुरलेल्या गावात विकास करणे किती अवघड असतं परंतु राज पाटलांनी मोठ्या जिद्दीनं मेहनतीनं आपल्या स्वखर्चातून गाव शिवारातील वस्त्यांना जोडण्यासाठी सुमारे १७ किलोमीटर रस्ते तयार केली. यासाठी लागणारा खर्च त्यांनी स्वतःच्या उत्पन्नातून केला. गावात पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबवून पाणीदार गाव करण्यासाठी योगदान दिले. गावातील सर्व विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण मिळावं यासाठी प्रत्येक वस्तीवर शाळेची उभारणी केली. त्याचबरोबर शेतकरी शेतमजुरांसाठी पाहिजे ती मदत राज पाटलांनी उपलब्ध करून दिली. हे सर्व कामे करताना त्यांना आमदार प्रकाश सोळंके यांचे सहकार्य वेळोवेळी मिळालं. गावाच्या विकासाचे काम करत असताना राज पाटलांनी वडवणी तालुका विकास समिती स्थापन करून वडवणी तालुक्यातील प्रत्येक गावातील एक एक सदस्य सोबत घेऊन वडवणी तालुका विकास समितीची स्थापना केली. या समितीच्या माध्यमातून तालुक्यातील विविध प्रश्नाला हात घालून त्यांनी तालुक्यातील विविध गावातील प्रश्न सोडविण्यावर भर दिला. प्रत्येक गावातील (पान ४ वर)

**याबाबत राज पाटील यांना विचारले असता आपण आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्यासोबत एकनिष्ठ काम करत असून पुढील काळात दादा जो निर्णय घेतील तो आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. दादा आणि जयसिंग भैया यांच्या नेतृत्वाखाली आपण दिलेली जिम्मेदारी योग्य पद्धतीने पार पाडू असा ठाम विश्वास राज पाटील यांनी डोंगरचा राजा शी बोलताना व्यक्त केला.**


# नाफेड
# दि.महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन

## शासकीय सोयाबीन खरेदी चालु आहे.





## * हमीभाव *

१) सोयाबीन- ५३२८/-

२) मुग - ८७६८ /-

पंजाबराव साहेबराव मस्के पाटील
अध्यक्ष

:: संपर्क कार्यालय ::

अमोल दिगंबर जाधव
सचिव

सब एजंट :- महालक्ष्मी बहु सर्व सेवा सहकारी संस्था, वडवणी .

मो. 9673469951 , 9604070860, 7030132727

Vikas farande Printing 9689770707

## संपादकीय

# दहशतवादातील ‘डॉक्टर’

पाकिस्तानमध्ये लोकशाही केवळ देखाव्यापुरती आहे. तिथे नुकतीच २७ वी घटनादुरुस्ती करून जवळपास लष्करशाहीच आणण्यात आली. लष्कराचे नियंत्रण सरकारकडे असेल, राष्ट्राध्यक्ष तिन्ही सैन्य दलांचे प्रमुख असतील, अशी तरतूद घटनेच्या २४३ व्या कलमात होती. परंतु घटनादुरुस्ती केली गेली आणि या तरतुदी बाद करत, ‘चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ’ हे नवीन पद असीम मुनीर यांच्यासाठी निर्माण करण्यात आले. अण्वस्त्र यंत्रणेची सूत्रेदेखील सरकारच्या किंवा संसदेच्या हातात होती, ती काढून मुनीर यांच्या हातात देण्यात आली. न्यायालयाचे अधिकारदेखील कमी केले गेले. मुनीर कट्टर भारतद्वेषी. यापूर्वी भारतावर लष्करी वा अण्वस्त्र हल्ले करण्याची धमकी त्यांनी दिलेली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यामागे मुनीर यांचाच मेंदू होता, हे उघड झाले. ‘ऑपरेशन सिंदूर’नंतरदेखील त्यांच्या भारतविरोधी कुरापती चालूच आहेत.

दिल्ली स्फोटावरून ते स्पष्ट झाले. लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ घडवून आणलेल्या भीषण स्फोटापूर्वी उच्चशिक्षितांचे दहशतवादी मॉड्यूल उघड झाले होते. या स्फोटाचा कट, त्यातील वीसहून अधिक डॉक्टरांचा उघड झालेला सहभाग या सार्या बाबी चक्रावून टाकणार्या आहेतच; त्या सावध करणार्याही आहेत. या दहशतवाद्यांना स्थानिकांचा मिळणारा आश्रय, मदत आणि रसद याही तितक्याच गंभीर बाबी. हरियाणातील फरिदाबादमधील अल–फलाह विद्यापीठासारख्या सुरक्षित ठिकाणाहून कटाची सूत्रे हलवली जात होती. फरिदाबाद येथून ९ आणि १० नोव्हेंबर रोजी अटक केलेल्या डॉ. मुझम्मिल गनी याच्या घरातून जम्मू–काश्मीर पोलिसांनी हा साठा जप्त केला होता. स्फोटाची मुळे दूरवर पोहोचली असून, स्फोटातील कारचालक डॉ. उमर नबी याच्या परिचयाच्या अल–फलाह विद्यापीठांमधील दोन डॉक्टर तसेच पठाणकोट येथून एका डॉक्टरसह चारजणांना ताब्यात घेण्यात आले.

तपास यंत्रणांनी पंजाबच्या पठाणकोट येथूनही एका ४५ वर्षीय डॉक्टरला हरियाणातील नूह जिल्ह्यातून दिनेश ऊर्फ डब्बू याला परवान्याशिवाय खते विकल्याबद्दल ताब्यात घेतले आहे. याच नूह येथे काही वर्षांपूर्वी दंगल झाली होती. पठाणकोट येथील अटकेत असलेला डॉक्टर हरियाणातील अल–फलाह विद्यापीठात पूर्वी काम करत होता. अल–फलाह विद्यापीठ आजवर अनेक कारणांनी चर्चेत आले आहे. जावेद सिद्दीकी विद्यापीठाचे संस्थापक असून, करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबद्दल ते तीन वर्षे जेलयात्रा करून आले आहेत. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने या विद्यापीठातील चार डॉक्टरांची वैद्यकीय नोंदणी रद्द केली आहे. यापैकी डॉ. रईस अहमद भट याला ताब्यात घेतले आहे. तपास यंत्रणांना मिळालेल्या माहितीनुसार, हा आत्मघातकी स्फोट घडवणार्या डॉ. नबीबरोबर तो संपर्कात होता. जैश–ए–मोहम्मद आणि अनसार गझवात–उल–हिंद या दोन संघटनांनी हे व्हाईट कॉलर मॉड्यूल तयार केले होते. नूहमधील दोन डॉक्टर्स, त्याचप्रमाणे खत व बी–बियाण्यांच्या विक्रेत्यांनाही ताब्यात घेऊन त्यांची उलटतपासणी घेतली जात आहे. विद्यापीठाच्या काही आजी–माजी विद्यार्थ्यांचीही चौकशी सुरू आहे. गरिबी आणि बेकारी या समस्यांमुळे जम्मू–काश्मीरमधील तरुण दहशतवादाकडे वळले, असा सिद्धांत मांडला जात होता. परंतु हा सिद्धांत अनेकवेळा खोटा ठरला आहे.

१९८९ साली व्ही. पी. सिंग यांच्या मंत्रिमंडळात मुफ्ती मोहम्मद सईद केंद्रीय गृहमंत्री या नात्याने काम पाहात होते. २ डिसेंबर १९८९ रोजी व्ही. पी. सिंग सरकारने कार्यभार स्वीकारल्यानंतर सातच दिवसांनी मुफ्ती यांची कन्या रुबिया हिचे ‘जेकेएलएफ’ संघटनेच्या हस्तकांनी अपहरण केले. डॉ. रुबिया ही श्रीनगरमधील रुग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टर होती. ९ डिसेंबर १९८९ रोजी ती घरी परतत असताना मिनी बस अडवून तिला जबरदस्तीने खाली उतरवले. रुबियाच्या सुटकेच्या मोबदल्यात काश्मीरमधील तुरुंगात असलेल्या ‘जेकेएलएफ’च्या बंडखोर नेत्यांच्या सुटकेची मागणी अपहरणकर्त्यांनी केली. केंद्र सरकारने या अतिरेकी संघटनेच्या मागण्या मान्य केल्या. बीबीसीच्या एका वार्ताहराचे तसेच आणखी काही नेत्यांचे व अधिकार्यांचेही अपहरण करण्यात आले.

‘जेकेएलएफ’प्रमाणेच हिजबुल मुजाहिदीन व लष्कर–ए–तोयबासारख्या पाकिस्तान धार्जिण्या संघटनाही फोफावल्या. जम्मू–काश्मीरमध्ये ‘आझाद काश्मीर’वादी संघटनांनी चालवलेल्या हैदोसाला पाकिस्तान पुरस्कृत जिहादी संघटनांच्या घुसखोरीमुळे धार्मिक विद्वेषाचा रंग चढला. लक्षावधी काश्मिरी पंडित कुटुंबांना काश्मीर सोडावे लागले. दिल्ली बॉम्बस्फोटातील संशयित उच्च पदवीधर आहेत. बहुतेकजण सधन कुटुंबांतील असून, कट्टरतावादाचे संस्कार झाल्यामुळे ते देशद्रोहाच्या पातळीपर्यंत उतरले. अल–फलाह विद्यापीठाच्या कॅम्पसमध्येच २९०० किलो स्फोटके आणि ज्वलनशील पदार्थ सापडले. त्यात अमोनियम नायट्रेट तसेच एनपीके खतेही मिळाली. काश्मीर, उत्तर प्रदेश आणि हरियाणाच्या मेवात येथील अनेक वैद्यकीय शाखेचे विद्यार्थी तसेच प्राध्यापक ताब्यात घेण्यात आले. त्यापैकी डॉ. शाहीन शाहिद ही फॉर्माकॉलॉजीतील एम.डी. असून, ती जैश ए मोहम्मदच्या महिला शाखेची उभारणी करत होती.

या विद्यापीठाचा हेतूच सुरक्षित वातावरणात कट्टरतावाद्यांची संघटना बांधून कट कारस्थाने रचणे, हा होता असे दिसते. जम्मू–काश्मीरमधील पंपोरातील रहिवासी अमीर रशीद अलीने डॉ. उमर नबीच्या साथीने हा कट रचला असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. दिल्लीत स्फोट घडवण्यासाठी वर्षभरापासून आत्मघातकी हल्लेखोराचा शोध सुरू होता. याच प्रकरणात एटीएसने मुंब्रा येथून एका उर्दू शाळेतील शिक्षकाला ताब्यात घेतले. पुण्यातील सॉफ्टवेअर अभियंत्याला ‘अल–कायदा’शी संबंधाच्या आरोपाखाली अटक झाली होती. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीवरून एटीएसने आणखी काहीजणांची झडती घेतली. एकीकडे पाकिस्तान भारतात अतिरेकी पाठवत असतानाच देशांतर्गत पातळीवरही जिहादी प्रवृत्तींना खतपाणी घातले जात आहे, ही अधिक गंभीर बाब. या जिहादी दहशतवादाची पाळेमुळे थेट विद्यापीठांपर्यंत पोहोचली आहेत. याचाच अर्थ धोका आणखी वाढला. त्यामुळे यापुढे तपास यंत्रणांना डोळ्यांत तेल घालून समन्वयाने काम करावे लागेल. बुद्धी आणि तंत्रज्ञानाच्या बळावर फोफावला जाणारा दहशतवाद देशाला अधिक घातक ठरू शकतो. तरुण–तरुणींची माथी भडकावून दहशतवादाचे सुरुंग पेरणार्यांची नांगी ठेचलीच पाहिजे.

# वडाळा गांवचे आठवणीतले सर

मुंबई, वडाळा गांवात जसे विठ्ठलाचे प्रतिपंढरपूर प्रसिद्ध आहे तसे, आमच्या क्लासचे सर देखील तितकेच प्रसिद्ध आहेत. आणि अत्यंत हुशार, जिद्द, झटपटीने, चिकाटीने आणि चातुर्याने अभ्यास शिकवून, सर्व विद्यार्थ्यांकडून पाठांतर करून घेणे, हे त्यांच्या उजव्या हाताचा खेळ आणि विद्यार्थिही तेवढ्याच जोमाने पाठांतर करीत असे.

आमची १९९८ ची बॅच आजही आठवते. सर ते सरच, ते कुठलेही असो. क्लासचे असो वा शाळेचे. यंदा २०२५ मध्ये २७ वर्षे झाली. आणि नवीन उमेद मिळाली. सरांना भेटण्याचा योग आला,आणि आजही आम्हाला आमच्या क्लासच्या निमित्ताने आमची शाळा, शाळेचा मैदान, बसायचा बाक, आमचे शिपाई मामा, आमचे सर, मॅडम आजही आठवतात आणि जास्त आठवण येते ती म्हणजे आमच्या क्लासचे सर. विद्यार्थांना शिकवून आम्हाला भेटण्यासाठी जेव्हा घरी आले, तेव्हा आम्ही सर्वांनी उभे राहून, आदरपूर्वक पायाला दोन्ही हात लावून नमस्कार केला. पाचवीपासून दहावीपर्यंत एकत्र क्लासमध्ये अभ्यास घेऊन जे काही विद्यार्थी त्यांनी असे घडविले, कि ते विद्यार्थी आता शिकून सातासमुद्रापार गेले आहेत. मोठमोठ्या हुद्द्यावर आज आहेत. तेही सर्व त्यांची आठवण काढत असतात. जेवढा काठीचा मार म्हणजेच (दंडाराज) मिळायचा तेवढा अभ्यास व पाठांतर तेवढ्याच ताकदीने व्हायचा. आजही हातावर मार खाल्लेला दंडाराज आठवतो. एकदा दंडाराज हातावर पडला की, दुसऱ्या दिवशी क्लासला येण्यासाठी विद्यार्थी कंटाळा करायचे. पण विद्यार्थी वेळेवर येत असत. आईवडिलांची माया त्यांनीही केलीय. हे कोणासाठी



आमच्यासाठीच, हे आता आम्हाला कळतय. एवढं मारून, गोंजारून, काही येत नसेल तर ते सारखं सारखं सांगणे. हा त्यांचा आगळा वेगळा स्वभाव.

एवढा प्रसिद्ध क्लास की, त्या वडाळा गांवचे सर्व मुले जास्तीच जास्त विद्यार्थी, विद्यार्थीनी एकाच दादर हिंदू कॉलनी, किंगजॉर्ज शाळेत जात असल्याने क्लासही बऱ्याच जणांचा तोच असायचा. यात दुमतच नाही. तेव्हा हा क्लास एवढा प्रसिद्ध होता की, जो तो विद्यार्थी तिथेच शिकवणी घेण्यासाठी आतुर असायचे. आजही ते सर जसे दिसत होते तसेच, आम्हाला भेटले आहेत. तेही २७ वर्षानंतर, पण दुसऱ्या विभागात. विभागाची नवीन सुधारणामुळे त्यांना तिथून जावे लागले. मोबाईलमध्ये ज्या नावाचा क्लास आहे त्या नावाने ग्रुप सुद्धा सूरू आहे. आजही क्लास सुरु आहे पण नेरुळला. पत्नीच्या नावाने हे क्लास आज नेरुळच्या विद्यार्थ्यांना घडवीत आहे. तिथे ते स्वतः, त्यांची पत्नी, मुलगी, मुलगा, भावाची मुलगी हे पाचजण आजही सर्व विद्यार्थ्यांना ट्युशनच्या नावाप्रमाणे संजीवनी देण्याचे अहोरात्र प्रयत्न करित आहे. विभाग बदलला म्हणून हार न मानता त्यावर मात करुन उज्वल यश मुलांना कसे प्राप्त करता येईल यावर जास्त भर हे संपूर्ण कुटुंब करीत आहे. अश्या ह्या कुटुंबाला आम्ही सर्व मित्र मैत्रिणी, आणि तुमचे अखंड असलेले विद्यार्थी नतमस्तक होऊन, हात जोडून, मनपूर्वक व आदराने नमस्कार करीत आहोत.

: **दिनेश जयराम हुमणे,**
**डोंबिवली**
९८३३५५७०४४

# मेट्रो–३’चा गाजलेला दावा भलताच उलटा?

## दिव्यांग सवलत, सुविधा, नेटवर्क सगळंच गायब?

मुंबईत धडाक्यात सुरू झालेली भुयारी मेट्रो–३ सेवासरकार आणि एमएमआरसीच्या गाजलेल्या घोषणांमुळे लोकांच्या अपेक्षा आकाशाला भिडल्या. पण प्रत्यक्ष प्रवासात प्रवाशांना, विशेषतः दिव्यांगांना, ज्या गोष्टींचा सामना करावा लागत आहे त्याबद्दल कुणी बोलतच नाही!



कथित ‘सुलभ प्रवास’, ‘प्रगत तंत्रज्ञान’, ‘सुविधांचा वर्षाव’या सर्व दाव्यांचा भलताच भंपकपणा उघड होऊ लागलाय. धडाकेबाज उद्घाटनानंतरही अनेक स्टेशनवर लिफ्ट बंद. व्हीलचेअरवरच्या दिव्यांगांसाठी हा प्रवास ‘मेट्रो’ नसून अडथळ्यांची शर्यत बनला आहे.

यातही धक्कादायक म्हणजे या अडचणींवर उपाय करण्याऐवजी प्रशासन ‘लवकरच’, ‘प्रक्रिया सुरू’, ‘तांत्रिक बदल’ यासारख्या रटाळ कारणांचंच घोळत बसलं आहे. दिव्यांगांसाठी जाहीर केलेली २५% सवलत कधी अमलात येणार याचा पत्ता नाही, आणि लिफ्ट तर बऱ्याच ठिकाणी अजूनही कायम बंदच.

यातच मोबाइल नेटवर्कचा एकदम ब्लॅकआऊट! आरेआचार्य अत्रे दरम्यान फक्त एकाच कंपनीचे नेटवर्क; तर आचार्य अत्रे चौक ते कफ परेड पूर्ण अंधार! मेट्रोखाली प्रवास करणारा प्रत्येक प्रवाशी ‘ऑफलाईन’ जीवन जगतो आहे.

आता मुद्दा असा की, ही परिस्थिती अचानक निर्माण झाली असेल तर ठीक, पण गेल्या एक–दीड महिन्यापासून सुरू असलेल्या या त्रासाचा कुणालाच पत्ता नसावा?

की पत्ता असूनही ‘लपवण्याचा’ प्रयत्न?आणि या सर्व गोंधळाच्या केंद्रस्थानी असलेला सर्वात महत्त्वाचा मुद्दा दिव्यांगांना दिलेला ‘सवलतीचा’ शब्द फसला; दहा दिवसांचा दावा वीस दिवसांपासून बुडीत!

मुंबई मेट्रो–३ सुरू होऊन दीड महिना उलटला, तरी दिव्यांग प्रवाशी आजही अडचणीतच. अनेक स्टेशनवर लिफ्ट बंद असल्याने व्हीलचेअरवरील प्रवाशी प्रवास करू शकत नाहीत. दिव्यांग हक्कांसाठी सातत्याने लढणारे ज्येष्ठ पत्रकार दिपक कैतके यांनी मुख्यमंत्री ते मेट्रो प्रशासनापर्यंत केलेल्या सततच्या पाठपुराव्यानंतर२८ ऑक्टोबर रोजी प्रशासनाने दिव्यांगांसाठी २५% सवलतीची घोषणा केली.

“दहा दिवसांत तांत्रिक बदल करून सवलत लागू होईल” असं एमएमआरसीने अधिकृत ’एक्स’ हँडलवरून जाहीरही केलं.मात्र वीस दिवस उलटले तरी एकाही तिकिटावर सवलत उपलब्ध नाही. आश्वासन फक्त कागदावर! लिफ्ट बंद, सुविधा अपूर्ण, अडथळे कायमदिव्यांगांसाठी प्रवास अधिकच कठीण.

याहूनही मजेशीरएमएमआरसीने जाहीर केलेला मासिक ट्रीप पास अजूनही सुरू झालेला नाही. दहा दिवसांत सुरू होईल, असं सांगून २० दिवस उलटले, पण सुविधा ‘ ’च! नेटवर्कबाबतही एमएमआरसी आणि मोबाइल कंपन्यांमधील वाद मिटलेला नाही. परिणामी प्रवाशी संपूर्ण मार्गिकेत नेटवर्कहिन प्रवास करतात.

मुंबईकरांची संख्या दीड लाख ओलांडली असताना सुविधांचा बोजवारा मात्र जसाच्या तसा. प्रवाशांतून एमएमआरसीला “सवलत लागू करा, लिफ्ट सुरू करा आणि नेटवर्क द्या!” अशी तीव्र मागणी होत आहे.

# श्रीकृष्ण ट्रेडर्स दुकान फोडले

माजलगाव:प्रतिनिधी

शहरातील चोऱ्यांचे सत्र थांबत नसून गजानन नगर रोडवर असलेल्या श्रीकृष्ण ट्रेडर्स या होलसेल दुकानाचे शटर वाकून चोरट्याने आतील दहा लाख रुपये किमतीचे सिगारेटचे आठ बॉक्स व नगदी ७५ हजार रुपये लंपास केले.ही घटना सोमवारी सकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.याप्रकरणी अज्ञात चार चोरट्याविरुद्ध माजलगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील गजानन रोडवर श्रीकांत श्रीनिवास रुद्रवार यांचे श्रीकृष्ण ट्रेडर्स हे होलसेल दुकान असून ते नेहमीप्रमाणे रविवारी रात्री लवकर दुकान बंद करून गेले होते.सोमवारी त्यांना सकाळी ७ वाजता शेजारील दुकानदाराने फोन करून सांगितले की,तुमचे दुकान फोडले असून तुम्ही तात्काळ इकडे या.यावर ते दुकानाकडे गेले असता त्यांना दुकानचे शटर वाकलेले दिसले.आत प्रवेश केला असता दुकानातील सिगरेटचे दहा लाख किमतीचे आठ बॉक्स व गल्ल्यातील नगदी ७५ हजार रुपये लंपास केल्याचे दिसून आले. तर दुकानातील सीसीटीव्हीचा डीव्हीआरही चोरट्याने तोडून नेल्याचे दिसले.यावरून त्यांनी बाजूला असलेल्या बँकेचे सीसीटीव्ही चेक केले असता दुकानासमोर सकाळी ५ वाजता स्विफ्ट गाडीत आलेल्या चार चोरट्यांनी सिगरेट बॉक्स पळवल्याचे दिसून आले.

यावेळी त्यांनी तात्काळ शहर पोलीसांशी संपर्क केला असता शहर पोलीस येऊन घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्हीची पाहणी करत शहरात अनेक ठिकाणी या वेळेचे सीसीटीव्ही फुटेज हस्तगत केले आहे.

# ह.भ.प. संपत काका निपटे यांचे निधन

वडवणी :प्रतिनिधी

पिंपरखेड येथील वारकरी संप्रदायातील एक प्रतिष्ठित नागरिक तथा प्रख्यात किर्तनकार ह.भ.प. बळीराम महाराज निपटे यांचे वडील ह.भ.प. संपतराव बाबुराव निपटे उर्फ काका यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७८ वर्षे होते.



संपतकाका निपटे म्हणून ते पंचक्रोशी मध्ये परिचित होते. वारकरी संप्रदायात बालपणी संत भगवानबाबांचे सानिध्य तर तरुणपणी संत भिमसिंह बाबा यांच्या समोर गायन करण्याची संधी काकांना मिळाली होती. बाबांनी संपतकाकांच्या सुमधुर आवाजातील गायनाचे कौतुक केले होते. जुन्या काळी मॅट्रिक पास झालेल्या काकांना वैद्यकीय क्षेत्रातील अभ्यास होता.

ग्रामीण भागातील लोकांसाठी ते फॅमिली डॉक्टरच होते. शिस्तप्रिय स्वभावामुळे वरुन कडक दिसायचे परंतु लोकांना वेळोवेळी सहकार्य करताना त्यांच्यातील प्रेमळ, मृदूपणा जाणवायचा. त्यामुळे ते पिंपरखेड गाव आणि परिसरातील लहानथोरांचे लाडके काका होते. माजी केंद्रीय मंत्री जयसिंगराव गायकवाड, माजी मंत्री आ. प्रकाश दादा सोळंके यांच्या सोबत त्यांचे जिवाभावाचे संबंध राहीलेले आहेत. अगदी मागील पंधरा

दिवसांपूर्वी पर्यंत त्यांची तब्येत ठणठणीत होती. मात्र अचानक तब्येत बिघडल्याने बीडमध्ये उपचार केले मात्र उपयोग झाला नाही. त्यांच्या पश्चात पत्नी, प्रख्यात किर्तनकार ह.भ.प. बळीराम महाराज निपटे यांच्यासह दोन मुले, एक मुलगी, पुतने नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. काकांच्या निधनामुळे पिंपरखेड गावावर शोककळा पसरली आहे.

# भाजपा चे २६ उमेदवार जाहीर

**माजलगाव:रवि राऊत**

माजलगाव नगराध्यक्ष व प्रभागातील उमेदवारांची अंतिम यादी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे.ती पुढील प्रमाणे

ओबीसी महिला न.प.अध्यक्ष पदासाठी कु.संध्या ज्ञानेश्वर मेंडके तर प्र.क्र.१:–अ)ना.मा.प्र.महिला सौ. सुमन माणिकराव मुंडे – ब)सर्वसाधारण सतीश रामचंद्र जोशी,प्र.क्र.२:–अ)अनुसुचित जाती महिला शितल धिरज अलझेंडे – ब) सर्वसाधारण–सय्यद कादीर सय्यद अहमदप्र.क्र.३:–अ)ना.मा.प्र.–आसेफ इनामदार खाजा,ब)सर्वसाधारण महिला– स्वाती सचिन डोंगरे,प्र.क्र.४:–अ)ना.मा.प्र.–दिपक जालिंदर मेंडके,ब)सर्वसाधारण महिला – कविता विनायक रत्नपारखी,प्र.क्र.५:– अ)सर्वसाधारण महिला – स्नेहा विनोदकुमार लड्डा,ब)सर्वसाधारण – प्रताप सोनाजीराव रांजवण,प्र.क्र.६:–अ) सर्वसाधारण महिला –उषा विशाल शिंदे, ब)सर्वसाधारण दत्तात्रय प्रल्हाद क्षिरसागर,प्र.क्र.७:–अ)ना.मा.प्र.महिला– सुशिला अशोक आळणे,ब)सर्वसाधारण –संतोष सुभाषराव सोळंके, प्र.क्रं.८अ)नामा.प्र.महिला –सरस्वती वसंत अलकुंटे – ब)सर्वसाधारण – शेख मोहसीन सु. इनुस,प्र.क्र.९:–अ)ना.मा.प्र.भगवान बाबुराव काळे – ब)सर्वसाधारण महिला, शेख अफरीन ईलियास पटेल,प्र.क्र.१० अ)सर्वसाधारण महिला–अनुराधा दत्ता महाजन,ब)सर्वसाधारण –अभय राजेभाऊ होके पाटील, प्र.क्र.११:–अ) नामा.प्र. महिला –कौशल्या गोपाळराव दळवे,ब) सर्वसाधारण–अजीम पठाण समंदर, प्र.क्रं.१२:–अ) अनुसूचित जाती – निकीता बाबासाहेब जाधव, ब) सर्वसाधारण – शेख अनिस शेख पाशा,प्र.क्र. १३:–अ)अनुसूचित जाती –संतोष विश्वनाथ जाधव,ब)सर्वसाधारण महिला – आशाताई राम गायकवाड अशी यादी भाजप चे वतीने जाहीर करण्यात आली आहे.

# स्वामी रामनंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्ति संग्रामात अमुल्य योगदान:देवेंद्र फडणवीस

## स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे व कमल तलावाचे मुख्यमंत्र्याच्या हस्ते लोकार्पण

छत्रपती संभाजीनगर: प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ति संग्रामाच्या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ यांनी तरुणाईमध्ये देशभक्ती जागृत करून महिला व अनेक स्वातंत्र्यसैनिकांना सोबत घेऊन निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त केले. हे योगदान अमुल्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

क्रांती चौक येथील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे अनावरण करून लोकार्पण केले. तसेच याच ठिकाणी ऑनलाईन पद्धतीने ऐतिहासिक कमल तलावाचेही लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह मराठवाडा मुक्ति संग्रामात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंबिय उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, खऱ्या अर्थाने मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये ज्यांनी मोलाची भूमिका पार पाडली ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या स्मारकाच्या उद्घाटन कार्यक्रमांमध्ये या ठिकाणी आल्यानंतर मला मनापासून समाधान होत आहे.




त्यांचे संपूर्ण जीवन ते व्रतस्त होते. स्वामी रामनंद तीर्थ हे खेडगीकर कुटुंबामध्ये जन्माला आले. यात त्यांचे एक शिक्षक म्हणून जीवन पाहायला मिळते, दीक्षा घेतल्यानंतर ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. स्वामी विवेकानंदाप्रमाणेच तरूणाईमध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी देशभक्ती जागृत केली. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला असला तरी मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळण्याकरीता १७ सप्टेंबर १९४८ म्हणजे जवळपास १३ महिन्याचा कालावधी लागला. १३ महिने मराठवाडा निजामाशी झुंजत होता.या कालावधीत मराठवाडा निजामाच्या इस्टेटचा भाग होता. ज्या १३ महिन्याच्या आधीच सुरू असलेल्या रजाकारांच्या संपूर्ण अन्यायाची पराकाष्टा झाली होती आणि त्याच्याविरुद्ध एक मोठा रणसंग्राम उभा झाला होता. यामध्ये इतर स्वातंत्र्यसैनिकांचे स्वामी रामानंद तीर्थ यांनी या लढ्यात नेतृत्व केले. या लढयाला एक प्रकारे संघर्षाच्या लढयामध्ये त्यांनी परिवर्तित केले. हैदराबाद असो की मराठवाडा असो या सगळीकडे त्यांनी जी काही स्वतंत्र अस्मितेची ज्योत पेटवली, त्यातून अनेक तरुण अनेक महिला या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये उतरल्या आणि त्यातून हैदराबादच्या निजामाच्या जोखडातून आपण मराठवाड्याला मुक्त करू शकलो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या मातब्बर गृहमंत्र्यांनी त्यांच्या या स्वतंत्र संग्राम सेनानींच्या हाकेला प्रतिसाद देत सैनिकी कारवाई केली आणि त्यातून मराठवाडा मुक्त झाला. तो दिवस म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ हा होता. तो आता दरवर्षी मराठवाडा मुक्ती दिन म्हणून आपण साजरा करतो आणि त्यावेळी प्रामुख्याने आपण स्वामी रामानंद तीर्थ यांचा पुण्यस्मरण करत आज त्यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करत आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले.


ऐतिहासिक कमल तलावाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. महानगरपालिकेने कमल तलावाच्या पुनर्जिवनाचे काम केल्याबद्दल महापालिका आयुक्त जी.श्रीकांत आणि त्यांच्या सर्व अधिकाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. छत्रपती संभाजीनगर शहरात येणाऱ्या पर्यटकांसाठी एक नवीन ठिकाण कमल तलाव म्हणून पाहण्यास उपलब्ध झाले असल्याचेही त्यांनी सांगितले. स्वामी रामनंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे शिल्पकार निरंजन मडिलगेकर यांचा यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कमल तलावाचे लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्वत: तिकीटाची खरेदी करून कमल तलाव नागरिकांसाठी खुला करण्यात आल्याचे जाहिर केले.

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.१९ ऑक्टोबर २०२५ । पान ३

## निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे :जिल्हाधिकारी

बीड : राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतीमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम- २०२५ दिनांक ०४.११.२०२५ रोजी घोषित केला असून बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूका कार्यक्रमात समाविष्ट आहेत. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहीता अंमलात आलेली आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदाच्या निवडणूका शांततेत व खुल्या वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली दि.४ नोव्हेंबर ला निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केलेले आहे.





# मधुकर ठोसर यांच्या गोल्डन चायनीज हाऊसचा भव्य शुभारंभ

वडवणी :प्रतिनिधी

राजकारणाला आणि समाजकारणाला व्यवसायाची जोड देत मधुकर ठोसर यांनी वडवणी येथे बीड-परळी हायवेवर हॅाटेल गोल्डन चायनीज हाऊसचा भव्य शुभारंभ केला. वडवणी शहराची मोठ्या झपाट्याने वाढ होत आहे. हॅाटेल व्यवसायाला सुध्दा मोठी तेजी आली आहे. खवयांचा ओघ व आवडी निवडी ओळखुन मधुकर ठोसर यांनी हॅाटेल व्यवसायाला सुरुवात केली आहे.आज या हॅाटेलचा भव्य शुभारंभ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. याावेळी नगराध्यक्ष शेषेराव जगताप, माजी आ. केशवदादा आंधळे, सभापती संभाजी शिंदे, सोमनाथराव बडे, विनोदकुमार नहार, बाबरी मुंडे, भारत जगताप मयूर बडे, तालुकाध्यक्ष बजरंग साबळे,

तालुका प्रमुख विनायक मुळे, शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष महादेव जमाले, दिनकर



करांडे नानासाहेब घोडके, राजू उनवणे, सुनिता नेटके, जगताप सर, संतोष डावकर, विकास मुंडे, अमोल आंधळे, रामेश्वर जाधव, अंगदराव घुगे,

बंडू नाईकवाडे, शेख अबेद, बाबुराव जेधे, दिनेश नाईकवाडे, आकाश कांबळे, शामराव जाधव, अंकुश सोनटक्के, गायकवाड किशोर, मुन्ना घुमरे, सह बीड जिल्ह्यातील मान्यवरांन उपस्थित होते,

उपस्थितांचे स्वागत राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे वडवणी तालुका अध्यक्ष तथा गोल्डन चायनीज हाऊसचे मालक मधुकरराव ठोसर व अशोक ठोसर,गोरख ठोसर यांनी केले.

# एकाच प्लॉटची दोनदा विक्री; ग्रामसेवक, सहदुय्यम निबंधकासह चौघांविरुद्ध गुन्हा

माजलगाव :प्रतिनिधी

शहराजवळील मनूर परिसरातील तीन प्लॉट दोनदा विकून एका दाम्पत्याची एक लाख शहाऐंशी हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी प्लॉट विक्री करणारे दोघे,त्यांना मदत करणारे मनूरचे ग्रामसेवक आणि कागदपत्रांची पडताळणी न करता दस्त नोंदविणारे सहदुय्यम निबंधक यांच्यासह एकूण चौघांविरुद्ध माजलगाव शहर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगावच्या खाटीक गल्लीतील मुस्ताक अब्दुल रज्जाक खाटीक यांना मनुर परिसरात प्लॉट खरेदी करायचा होता.त्यांनी ओळखीचे शेख मुस्तफा शेख रहीम याच्याशी संपर्क साधला.शेख मुस्तफा यांनी मनुर ग्रामपंचायत हद्दीतील प्लॉट क्रमांक १८२ हा सलीम नजीर शेख यांच्या मालकीचा असून,तो बासष्ट हजार रुपयांत मिळवून देतो,असे सांगितले.त्यानुसार खाटीक यांनी ७ ऑगस्ट २०२४ रोजी बासष्ट हजार रुपये देऊन खरेदीखत करून घेतले. त्यानंतर आणखी दोन प्लॉट विक्रीस असल्याचे आमिष दाखवून शेख मुस्तफा यांनी खाटीक यांच्या पत्नी रिजवाना यांच्या नावे प्लॉट क्रमांक ४५ व २४६ खरेदी करण्यास भाग पाडले. मुस्ताक खाटीक यांच्या फिर्यादीवरून प्लॉट विक्री करणारे सलीम शेख,शख मुस्तफा शेख रहीम, ग्रामसेवक अनिल दाऊदसरे आणि तत्कालीन सहदुय्यम निबंधक यांच्यासह संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून,माजलगाव शहर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

खरेदीनंतर १५ दिवसांनी, मुस्ताक खाटीक हे खरेदी केलेल्या प्लॉटवर आपल्या नावाचा फेरफार करण्यासाठी मनूर ग्रामपंचायत कार्यालयात गेले.तेथे ग्रामसेवक अनिल दाऊदसरे यांनी नाव लावण्यासाठी टाळाटाळ केली आणि उडवाउडवीची उत्तरे दिली. संशय आल्याने खाटीक यांनी थेट प्लॉटवर जाऊन पाहणी केली असता,तिथे आधीपासूनच असलेल्या कब्जेदारांनी हे प्लॉट आपण २०२२-२३ मध्येच कायदेशीररीत्या विकत घेतल्याचे सांगितले व खरेदीचे दस्तऐवज दाखविले.आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच मुस्ताक खाटीक यांनी शहर पोलिस ठाणे गाठले ग्रामसेवक अनिल दाऊदसरे यांनी प्लॉटची मालकी सलीम शेख व मुस्तफा शेख यांच्याकडे नसतानाही त्यांना नमुना आठ आणि खरेदीसाठी आवश्यक असलेले 'ना हरकत प्रमाणपत्र' दिले.धक्कादायक बाब म्हणजे,एक दस्त नोंदणी २७ तारखेला झाली असताना, त्याला जोडलेले ना हरकत प्रमाणपत्र २८ तारखेचे आहे. सह दुय्यम निबंधक कार्यालयानेही या बोगस कागदपत्रांची कोणतीही पडताळणी न करता दस्त नोंदवून घेतल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.ही बोगस कागदपत्रे सत्यम कॉम्प्युटर्स येथे शरद भांडेकर यांनी तयार केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.




माजलगाव : सादोळा टी पॉईंट नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुका माजलगाव चेक पोस्ट गाडीची तपासणी करताना कर्मचारी वर्ग

## छत्रपती संभाजी महाराज यांचा अवैध पुतळा उभारणी प्रकरणी दहा जणांवर गुन्हा

माजलगाव :शहरातील संभाजी चौक या ठिकाणी शनिवारी पहाटे दोन वाजता छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा रात्रीतून उभा करण्यात आला म्हणून दहा जणांविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील बायपास रस्त्यावर संभाजी चौकात शनिवारी पहाटे २चे दरम्यान वाजता काही युवकांनी लोखंडी सांगाड्यावर आठ फूट उंचीचा छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारला. या पुतळ्यावर एक बॅनर होते,त्यावर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांचा फोटो व नाव आढळून आले. त्यावर अंदाजे आठ फुटांचा अनधिकृत पुतळा उभारला. पुतळा उभारण्यात शासनाची कुठलीही कायदेशीर परवानगी नसल्याने नगर परिषदेने याबाबत पोलिसांत तक्रार दिली.पोलिसांनी घटनास्थळी सीसीटीव्ही तपासणी करून त्याआधारे बाळराजे आवारे पाटील व सुशील सोळंके (रा.सादोळा) यांच्यासह आठ ते दहा जणांविरोधात अनंत नामदेव वाघमारे यांच्या फिर्यादीनुसार शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/१०/२०२५

अर्जदाराचे नाव : उत्तरेश्वर नारायण सौंदणे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- संतोष गंपु पवार

प्रकरण : गट क्रं.४२५ प्लॉट क्र.०६

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ८.७५ मी, दक्षिणोत्तर ६.७० मि. एकुण क्षेत्रफळ ५८.६२ चौ. फुट

पुर्व - २५ फुट रस्ता, पश्चिम - महादेव सातपुते

दक्षिण - खुली जागा, उत्तर - बापुराव सौंदणे

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/१०/२०२५

अर्जदाराचे नाव : १) श्रीमती. संगिता भ्र. कैलास पाटसकर, २) श्रीकृष्ण पि. कैलास पाटसकर, ३) श्री. बळीराम पि. कैलास पाटसकर ४) श्री. नामदेव पि. कैलास पाटसकर

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. कैलास गोपिनाथ पाटसकर

प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र.१३४३ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ३० फुट दक्षिणोत्तर ६० फुट एकुण क्षेत्रफळ १८०० चौ. फुट

पुर्व - सुनिल चंद्रकांत चव्हाण, पश्चिम - प्रभाकर सोनाजी जाधव

दक्षिण - खुली जागा, उत्तर - रस्ता १५ चा

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/१०/२०२५

अर्जदाराचे नाव १) श्रीमती. फातेमा सुजावद्दीन सय्यद २) श्री. अहमद मेहबूब पठाण विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्रीमती. मिरा साहेबराव पायके

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४०४ मिळकत क्र. ३०९७ वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ४० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ १११.५२ चौ.मी.

पुर्व - साोनवणे यांचा प्लॉट, पश्चिम - शेख यांचा प्लॉट

दक्षिण - रस्ता,उत्तर - परमेश्वर डोरले यांचा प्लॉट

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. सहदेव केशव मुंडे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. उल्हास सावलाराम भोईर

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ३८५ प्लॉट क्र.३९ मिळकत क्र.४०१० वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ४० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ १११.५२ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र. २२, पश्चिम - ३० फुट रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र. ४०, उत्तर - प्लॉट क्र. ३८

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. राजेभाऊ दशरथ चुंबळे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्रीमती. रुक्मीण ज्ञानेश्वर लोकरे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.५३१ प्लॉट क्र. २६३ वडवणी येथील आहे.सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम २५ फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ ६९.७० चौ.मी.

पुर्व - शिंदे यांची जमीन, पश्चिम - ३० फुट रस्ता

दक्षिण - नेहरकर, उत्तर - काळे यांची जमीन

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्रीमती. केशरबाई तुळशिराम मुंडे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. उल्हास सावलाराम भोईर

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र. ३८५ प्लॉट क्र.५२ मिळकत क्र. ४०२१ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ३५ फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ ९७.५८ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र. ४९, पश्चिम - ३० फुट रस्त

दक्षिण - प्लॉट क्र.५३, उत्तर - प्लॉट क्र.५१

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२५

अर्जदाराचे नाव श्रीमती. लक्ष्मी अनंद दराडे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. उल्हास सावलाराम भोईर

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.३८५ प्लॉट क्र.५८ मिळकत क्र. ४०१४ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ३५ फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ ९७.५८ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र. ४३, पश्चिम - ३० फुट रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र.५९, उत्तर - प्लॉट क्र.५७

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्रीमती. सिमा गोरक्षनाथ मुंडे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. उल्हास सावलाराम भोईर

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.३८५ प्लॉट क्र.५३ मिळकत क्र.४०१९ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम ३५ फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण क्षेत्रफळ ९७.५८ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र. ४८, पश्चिम - ३० फुट रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र. ५४, उत्तर - प्लॉट क्र.५२

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. सलीमा रशीद शेख

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. नितीन भिमराव उजगरे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४४४ प्लॉट क्र.७५ मिळकत क्र. ४५९२ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम १३ मी. दक्षिणोत्तर ०७ मी. एकुण क्षेत्रफळ ९१ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र.६२, पश्चिम - ०९ मीटर रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र.७४, उत्तर - प्लॉट क्र.७६

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०९/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. सलीमा रशीद शेख

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव- श्री. नितीन भिमराव उजगरे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत गट क्र.४४४ प्लॉट क्र.७५ मिळकत क्र. ४५९२ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार-१) पुर्वपश्चिम १३ मी. दक्षिणोत्तर ०७ मी. एकुण क्षेत्रफळ ९१ चौ.मी.

पुर्व - प्लॉट क्र.६२, पश्चिम - ०९ मीटर रस्ता

दक्षिण - प्लॉट क्र.७४, उत्तर - प्लॉट क्र.७६

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि. १९ नोव्हेंबर २०२५ । पान ४



**केसापुरी परभणी येथील सोलार पंप वादळी वाऱ्याने फुटले.!** : शेतकरी व्यंकट वरकड यांच्या शेतातला सोलार पंप केसापुरी परभणी ता.जी.बीड येथील शेतकरी व्यंकट माणिकराव वरकड यांच्या गट क्रमांक १०७ मधील शेतात विहिरीतुन पाणी सिंचनासाठी बसवलेल्या सोलार पंप चे १ पॅनल दिनांक ७/९२०२५ आलेल्या वादळी वाऱ्याने फुटले आहे.

# दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये लढत रंगली

## निवडणूक निर्णय अधिकारी इंगोले यांनी दोन्ही आक्षेप फेटाळत निर्णय दिले

माजलगाव :रवि राऊत

नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)च्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मेहरीन शिफा बिलाल चाऊस यांच्या ओबीसी जात प्रमाणपत्रावर विरोधक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(अ.प.) गटाच्या आतार नेहरोनिसा खलिल पटेल यांचे वतीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे घेतलेला आक्षेप कालांतराने झालेल्या सुनावणी दरम्यान गौरव इंगोले यांनी फेटाळून लावत मेहरीन शिफा बिलाल चाऊस यांचा उमेदवारी अर्ज मंजुर करण्यात आला.यावेळी पक्षाचे वतीने आनंद व्यक्त केला.

या नगरपालिकेची निवडणूक आमदार प्रकाश सोळंके,जयसिंग सोळंके, राष्ट्रवादीचे मोहनराव जगताप,बहुजन विकास मोर्चाचे बाबुराव पोटभरे,श्रीहरी मोरे,सहाल चाऊस, नारायण डक यांनी प्रतिष्ठेची केली. कारण नगराध्यक्षपदाच्या उमेदवारी अर्जावर व सहाल चाऊस यांच्या नगरसेवक पदाच्या उमेदवारी अर्जावर आमदार सोळंके समर्थकांनी वेगवेगळी कारणे दाखवत आक्षेप घेत त्यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्याचा प्रयत्न केला. त्यातच माजलगाव नगरपालिकेच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प.)गट, बहुजन विकास मोर्चा यांच्या संयुक्त युतीच्या उमेदवार मेहरीन शिफा बिलाल चाऊस यांच्या ओबीसी जात प्रमाणपत्रावर ते बनावट असल्याचा आक्षेप घेऊन त्यांचा अर्ज रद्द करण्याची मागणी त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ.प.)गटाच्या नेरोनिसा खलिल पटेल आतार यांनी सकाळी निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले हे उमेदवारी अर्ज पडताळणी करीत असताना आक्षेप घेतला होता.त्या आक्षेपावर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपला निर्णय राखून ठेवत.दोन्ही पार्टीच्या वकिलांना आपला आक्षेप दाखल करण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या.

तहसील कार्यालयात सदरील सुनावणी दरम्यान शहरातील जनता या निर्णयाची वाट पाहण्यासाठी तहसील कार्यालयात गर्दी करून होते. यावेळी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी आपला चोक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.याच दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले,दुपारी ३ वाजता पहिल्या नगर सेवक पदासाठी लढत असलेले माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांच्या उमेदवारीवर स्वस्त धान्य दुकानदार हे लाभाचे पद व इतर त्रुटीवर आक्षेप दोन्ही बाजुच्या वकिलांनी युक्तिवाद केला व काही कायदेशीर बाबी तपासण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यानी अर्ध्या तासासाठी निर्णय राखून ठेवला नंतर तो निर्णय सहाल चाऊस यांच्या बाजूने देऊन अर्ज वैध ठरवला. याच वेळी तुतारीच्या उमेदवार मेहरिन शिफा बिलाल चाऊस यांच्या जात प्रमाणपत्रावर घेतलेल्या आक्षेपावर निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले यांनी सुनावणी घेतली.सदरी आक्षेपावर निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले यांनी सदरील जात प्रमाणपत्र उमेदवारी आर्जासोबत असल्याने व तुम्ही या बाबत केलेल्या तक्रारी बाबत शासनाचा व कोणत्याही न्यायालयाचा निर्णय नसल्याने मेहरुनिसा खलिल पटेल आतार याचा मेहरीन शिफा बिलाल चाऊस यांच्या उमेदवारी अर्जावर घेतला आक्षेप फेटाळत तो उमेदवारी अर्ज वैध असल्याचा निर्णय दिला.

# छत्रपती सहकारी साखर कारखाना, सावरगाव यांना 'ग्रीन वर्ल्ड को. प्राईड' पुरस्कार जाहीर

माजलगावःप्रतिनिधी

ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सहकार मंथन २०२५' उपक्रमांतर्गत सहकार क्षेत्रात उत्कृष्ट व मोलाचे योगदान दिल्याबद्दल छत्रपती सहकारी साखर कारखाना, सावरगाव यांना "ग्रीन वर्ल्ड को. प्राईड" हा मानाचा व प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे. कारखान्याच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची, नाविन्यपूर्ण उपक्रमांची आणि पर्यावरणपूरक कामकाजाच्या ध्येयधोरणांची ही अधिकृत दखल मानली जात आहे. या पुरस्काराचे वितरण दि.२१ डिसेंबर रोजी पुणे येथे होणार आहे.

कारखान्याने गेल्या काही वर्षांत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हितसंवर्धनावर भर देत उत्पादनातील पारदर्शकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, ऊसाला दिलेला स्पर्धात्मक दर, यांसारख्या उपक्रमांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. या सर्व उपक्रमांचा समन्वय साधत कारखान्याने सहकार क्षेत्रात आदर्श स्थान निर्माण केले आहे.या यशाची दखल घेत वरील संस्थांकडून कारखान्यास प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून याबद्दल चेअरमन बाजीराव जगताप तसेच व्हा. चेअरमन मोहनराव जगताप, व्यवस्थापन मंडळ, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी व कर्मचारी वर्गात समाधानाची भावना व्यक्त होत आहे. सहकाराच्या बळावर घेतलेली कारखान्याची ही झेप प्रेरणादायी असल्याचे मत विविध स्तरांतून व्यक्त केले जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल कारखान्याचे व्यवस्थापन मंडळ, सर्व सभासद, अधिकारी-कर्मचारी आणि हितचिंतकांचे सर्व स्तरांतून मनःपूर्वक अभिनंदन होत आहे.




# खडकी देवळा येथील भव्य यात्रेत सहभागी व्हावे :सरपंच अशोक चोले

वडवणीःप्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सर्व जनतेस कळविण्यात येते की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री खंडोबा यात्रेनिमित्त मौजे खडकी देवळा या ठिकाणी जंगी कुस्त्यांचा कार्यक्रमा बरोबरच इतर महत्त्वाचे कार्यक्रम सुध्दा आयोजित करण्यात आले असून या यात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन सरपंच श्री. अशोक चोले यांनी केले आहे.



या बाबत अधिक वृत्त असे की, वडवणी तालुक्यातील खडकी देवळा या ठिकाणी गुरुवार दि.२७/११/२०२५ रोजी भव्य यात्रा उत्सव संपन्न होत आहे. पंचक्रोशीतील नागरीकांनी सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. कुस्त्यांची बक्षीसे : १० रु. ते ५५५१ रुपये शेवटची कुस्ती ५५५१ रुपयांची असणार आहे.तसेच मंगळवार दि.२५/११/२०२५ नागदिवे कार्यक्रम होईल.बुधवार रोजी दि.२६/११/२०२५ तळी भंडार व पालखी मिरवणूक कार्यक्रम होईल.बुधवार दि.२६/११/२०२५ : ताजी यात्रा.दि.२६ व २७ नोव्हेंबर रोजी सायं. ८ वाजेनंतर लोकनाट्य तमाशा कार्यक्रम होईल.जय मल्हार जागरण गोंधळ पार्टी खडकी बप्पा मनोहर वाघे यांचा दि.२६ ते २७ नोव्हेंबर रोजी कार्यक्रम सुध्दा आयोजित करण्यात आला असून या सर्व कार्यक्रमांसाठी आपण सर्वांनी आवर्जून उपस्थित राहुन यात्रेची शोभा वाढवावी असे आवाहन सरपंच श्री.अशोक चोले यांनी केले आहे.

# वडवणीमध्ये सोयाबीन, मुगाची ऑनलाईन नोंदणी करावी

वडवणीःप्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वडवणी तालुका खरेदी विक्री संघ नाफेड अंतर्गत आधारभूत किमतीने सोयाबीन, मूग खरेदी योजना २०२५-२०२६ सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत सोयाबीन, मूग या पिकांची शासकीय हमीभावाने खरेदी होणार आहे. शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. नोंदणीची अंतिम तारीख ३१ डिसेंबर २०२५ असून, सर्व शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपली नोंदणी पूर्ण करून घ्यावी असे आवाहन महालक्ष्मी बहु सर्व सेवा सहकारी संस्था वडवणी च्या वतीने करण्यात आले आहे.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासनाने परवानगी दिली आहे.त्यामुळे वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. या खरेदी केंद्रात पिकांसाठी खालील प्रमाणे सोयाबीन ५३२८ प्रतिक्विंटल, मूग ८७६८ प्रतिक्विंटल हमीभाव निश्चित करण्यात आला आहे. नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी खालील कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहावे ७/१२ व ८अ उतारा (ई-पिक पाहणीसह),

आधारकार्ड, बँक पासबुक चालू खाते, जनधन खाते स्वीकारले जाणार नाही, शेतकऱ्यांचे नाव सातबारावर असणे आवश्यक असून शेतकऱ्यांने स्वतः कागदपत्रासह उपस्थित राहणे अनिवार्य असल्याचे आवाहन सुध्दा महालक्ष्मी बहु सर्व सेवा सहकारी संस्था वडवणीच्या वतीने करण्यात आले आहे.

# चिखलबीड पंचायत समिती गणांमध्ये जावळे व सुरेश डोंगरे यांचा मतदार गाठी भेटीवर भर

वडवणी : प्रतिनिधी

चिखलबीड पंचायत समिती गणा मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाकडून निवडणूकीसाठी इच्छुक असलेले उमेदवार विजयकांत जावळे व सुरेश डोंगरे यांनी या भागात असलेल्या मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर भर दिला असुन या भागात त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

विजयकांत जावळे यांच्या पत्नी सौ.सुषमा जावळे यांना चिखलबीड पंचायत समिती गणातून उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी जावळे समर्थकांडून आ.प्रकाश सोळंके यांच्याकडे केली आहे. वडवणी तालुक्यातील चिखलबीड पंचायत समिती गण हा अनुसूचित जातीसाठी आरक्षित झाला आहे. यामुळे आ. प्रकाश सोळंके यांचे समर्थक असणारे विजयकांत जावळे यांच्या पत्नी सुषमा जावळे यांचे नाव या पंचायत समिती गणातून प्रबळ दावेदार म्हणून पुढे आले असून विजयकांत जावळे व सुरेश डोंगरे यांनी या भागात मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर भर दिला आहे.

# 'भुताचा दगड' पोस्टर अनावरण

बीड: भुताचा दगड या नाटकाचा पोस्टर अनावरण सोहळा शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा माननीय.ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते संपन्न झाला. या नाटकाचे लेखक श्री बनकर दत्ता व दिग्दर्शन श्री.विजय इंगळे व सौ.मीना वाघमारे यांनी केले आहे .भुताचा दगड या नाटकाचे नाट्यप्रयोग महाराष्ट्रातील सर्व नाट्यगृहामध्ये केले जाणार आहेत. शंभर वर्षानंतर असे नाटक रंगमंचावर येत आहे.आतापर्यंत अशा विषयावर कधीही नाटक रंगमंचावर आलेले नाही . प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांना दाखवावे असे एक नाटक लवकरच संपूर्ण महाराष्ट्राच्या नाट्यगृहामध्ये या नाटकाच्या शोचे आयोजन केले जाणार आहे. महाराष्ट्रातील नाट्यप्रयोगासाठी शिवसंग्राम पक्ष व नवअधिरा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड या दोन्ही या नाटकासाठी सहकार्य करणार आहेत. महाराष्ट्रातील प्रेक्षकांना अनोखे वेगळ्या पद्धतीचे नाटक सर्व प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

# दत्तात्रय आलगट यांचं अकाली निधन

वडवणी : प्रतिनिधी

अत्यंत मन दुःखी करणारी बातमी वडवणी शहरात पसरली. सर्वांचे सहकारी मित्र मातोश्री हॉटेल चे सर्वेसर्वा श्री.दत्तात्रय आलगट यांचे अकाली निधन झाल्याची वेदनादायी बातमी समजली. आणि शहरात हळहळ व्यक्त केली गेली. अत्यंत शांत, मनमिळाऊ, सर्वांना मदत करणारे श्री.दत्तात्रय आलगट यांचे निधन झाले असून

त्यांच्या पार्थिवावर आज बुधवार रोजी सकाळी ८ : ३० वाजता वैकुंठधाम येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.




# निष्ठेला अन् कष्टाला फळ मिळेल

पान १ वरुन

एक एक सदस्य या समितीवर घेण्यात आला होता आणि योगायोग असा की या समितीतील जवळपास १६ ते १७ जण आपापल्या गावातील सरपंच झाले. राज पाटलांच्या कामाची धमक पाहून समाजामध्ये त्यांच्या नावाचं आणखीनच बळ वाढत गेलं पुढे राज पाटलांनी लढा दुष्काळाशी फाउंडेशन ची निर्मिती करून त्या माध्यमातून वडवणी तालुक्यातील गरजवंतांना मदत करण्याचे काम सुरू ठेवले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी बी बियाणे खते उपलब्ध करून दिले तर गोरगरिबांच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी योगदान दिले. कोरोनाच्या महामारीमध्ये गरजवंतांना किराणा आणि अन्नधान्य वाटप करण्याचे महत्त्वाचे कार्य राज पाटलांनी यांनी केलं.

प्रत्येक गावामध्ये हजारो वृक्ष लागवड करून निसर्ग संवर्धनाचे पवित्र कार्य त्यांनी हाती घेतलं आहे. त्यामुळे राज पाटलांना सर्वसामान्य लोकांमध्ये आदराचे स्थान आहे. मागील पंचवीस वर्षापासून आमदार प्रकाश सोळंके यांच्या सोबत एकनिष्ठ काम करणारे राज पाटील यांची समाजातील प्रतिमा अत्यंत निर्मळ आहे.त्यामुळेच होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत राज पाटील यांच्या सारखा स्वच्छ चारित्र्यसंपन्न युवा नेता निवडणुकीत उतरावा अशी भावना सर्वसामान्य जनतेची आहे. चिखलबीड जिल्हा परिषद सर्कल मधून राज पाटील यांना उमेदवारी दिली तर नक्कीच राज पाटील बहुमताने निवडून येतील असे सर्वसामान्य लोकांकडून सांगण्यात येत आहे. आमदार प्रकाश सोळंके हे राज पाटील यांनाच या सर्कल मधुन उमेदवारी देतील आणि जनता त्यांना निवडून देईल अशी चर्चा या भागातील सर्व सामान्य मतदारांमधून ऐकायला मिळत आहे.







हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)